# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 05/01/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

### सरकारी कामकाजात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. वेलतुरः— फिर्यादी नामे— विक्रम मारोतराव उराडे, वय ३८ वर्ष, रा. वेलतूर यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. वेलतूर येथे अप. क्र. २४७/२०१८ कलम ३५३, ३३२, ५०४, ५०६ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

फिर्यादी हा आपले एम. एस. ई. बी कार्यालयात काम करीत असता यातील आरोपी नामे—सुरज हेमचंद्र रामटेके, वय ३८ वर्ष, रा. वार्ड क्र. २ वेलतूर याने कार्यालयात येवुन माझा घरची लाईन नेहमी जात राहते तुम्ही काय काम करता असे म्हणुन फिर्यादी याला शासकीय कर्तव्य करू नये म्हणुन धाकाने परावृत्त करून दुखापत पोहचविले.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक किशोरकुमार वैरागडे, पोस्टे वेलतूर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक ०५/०१/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री आर. आर. भोसले न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३५३ भांदवि मध्ये ०३ वर्ष सश्रम कारावास व २०००/— दंड दंड न भरल्यास ०५ महीने सश्रम कारावास व कलम ३३२ भादवि. मध्ये २ वर्ष, सश्रम कारावास व १०००/— रू. दंड, दंड न भरल्यास ०३ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी दिपीका गवळी यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोलीस शिपाई १२७२ अशफाक शेख पो.स्टे वेलतूर यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर